# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

२८/८/२४
5:50

दिनांक : २६/०८/२०२४

# प्रेसनोट

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून सणांचे पर्यावरणपुरक साजरीकरण करणेच्या अनुषंगाने नागरीकांमध्ये जनजागृती करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने मा. आयुक्त तथा प्रशासक, विकास ढाकणे, अतिरिक्त आयुक्त, जमीर लेंगरेकर तसेच उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण विभागप्रमुख यांनी महापालिकेच्या मिटटाऊन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर-१ याठिकाणी दिनांक २६ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट, २०२४ रोजी पर्यंत पर्यावरणपुरक गणेशमुर्ती तसेच पर्यावरणपुरक आकर्षक सजावट साहित्यांचे प्रदर्शन भरविले आहे.

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्लास्टर ऑफ पॅरीस च्या मुर्त्यांवर बंदी घालण्यात आलेली आहे. प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मुर्त्यांचे जलाशयात विसर्जन केल्यानंतर सदर मुर्त्यांचे पाण्यात विघटन होत नाही. तसेच सदर मुर्त्यांवर रंगरंगोटीसाठी वापरलेल्या रासायनिक रंगामुळे पाणी प्रदुषित होवुन जलाशयातील जलचरांचे जीवन धोक्यात येते. याकरीता नागरीकांनी मातीपासुन किंवा पर्यावरणपुरक साहित्यापासुन तयार केलेल्या व लहान आकाराच्या मुर्त्यांचा वापर करावा तसेच प्लास्टीक व थर्माकोलचा वापर करू नये याबाबत जनजागृती करणेसाठी सदर प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

सदर प्रदर्शनामध्ये कागदाच्या लगदयापासुन तयार केलेली, धातुची, लाल माती तसेच शाडू पासुन तयार केलेल्या मुर्त्या त्याचप्रमाणे कागदाच्या पुठठयापासुन, कापडापासुन तयार केलेली आकर्षक मखर व लोकरीपासुन तयार केलेली आरासीचे साहित्य ठेवण्यात आली आहेत.

उल्हासनगर शहरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सदर प्रदर्शन नागरीकांसाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी सायं. ७.०० वाजेपर्यंत खुले राहणार आहे. तरी महापालिकेकडून भरविण्यात आलेल्या प्रदर्शनास भेट दयावी. आगामी गणेश उत्सव इतर उत्सवादरम्यान पर्यावरण पुरक साहित्यापासुन तयार केलेल्या वस्तुंचाच वापर करावा व आपले शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणमुक्त करण्यास महापालिकेस सहकार्य करावे.

२६/८/२४

(छाया प्रकाश कांबळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका